N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** कोल्हापुर
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0313 **P.S.(ठाणे):** हातकणंगले **Year (वर्ष):** 2023
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 13/07/2023 02:10

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** बुधवार
**Time Period (कालावधी):**
**Date From (दिनांक पासून):** 12/07/2023
**Date To ( दिनांक पर्यंत):** 12/07/2023
**Time From (वेळेपासून):** 12:04 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 17:22 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 13/07/2023 **Time (वेळ):** 01:27 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 004
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 13/07/2023 01:27 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
दक्षिण, 7 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** ग्रामपंचायत इमारतीचे तलाठी कक्, साजणी, ता हातकणंगले,हातकणंगले

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with CamScanner

6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) Name (नाव): श्री सत्याप्पा सदु पुजारी

(b) Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :

(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष): 1990

(d) Nationality (राष्ट्रीयत्व): भारत

(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):

(f) Passport No.(पारपत्र क्र.):

Date of Issue (दिल्याची तारीख):

Place of Issue (दिल्याचे ठिकाण):

(g) ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) Address (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | तिळवणी, ता हातकणंगले,हातकणंगले ,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | तिळवणी, ता हातकणंगले,हातकणंगले ,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |

(i) Occupation (व्यवसाय):

(j) Phone number (फोन नं.):

Mobile (मोबाइल नं.): 91-8329365004

7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | सर्जेराव शामराव घोसरवाडे | | | 1. प्लट नं108,स्वप्नपुर्ती अपार्टमेंन्ट,पुईखडी, नविन वाशीनाका जवळ,कोल्हापूर, हातकणंगले ,कोल्हापुर,महाराष्ट्र, भारत |
| 2 | साहील यासीन फरास | | | 1. तिरंगा चौक, साजणी, हातकणंगले ,हातकणंगले , कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |

8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):



Scanned with CamScanner

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 20,000/त्यात भारतीय 500 रु दराच्या 40 चलनी नोटा | 20,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

20,000.00

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दिनांक -12/07/2023

मी श्री सत्याप्पा सदु पुजारी, वय-33 वर्षे, व्यवसाय- मेंढपाळ, रा.तळवणी, ता. हातकणंगले जि.कोल्हापूर मो.नं. 8329365004 समक्ष पोलीस ठाणेस हजर राहुन फिर्याद देतो की,

मी दिनांक 12/07/2023 रोजी अँन्टी करप्शन ब्युरो कोल्हापूर येथील पोलीस उपअधीक्षक श्री.सरदार नाळे यांना फोन करून त्यांना माझेकडे होत असलेल्या लाच मागणीबाबत तक्रार सांगीतली की, मी स्वतः तिळवणी येथे गट नं.188 मधील एकुण क्षेत्रापैकी 21 आर इतके क्षेत्र जमीन खेरेदी दस्ताने रजिस्टर खरेदी केली आहे. ती नोंद फेरफार करणे आहे. तसेच माझे वडीलांचे नावे तिळवणी येथील गट नं.184 वर बँकेचे कर्ज घेतले असुन त्याचा तारण दस्त रजिस्टर असुन बँकेचा बोजाची नोंद फेरफार मध्ये करणेची आहे. वरील खेरदी केलेल्या जमीनीच्या खरेदी दस्ताची व वडीलाचे नावे असलेल्या जमीनीवर घेतले बँकेचे कर्जाची नोंद असलेला दस्त असे दोन्ही दस्त फेरफार नोंद करणेकामी मी साजणी- तिळवणी चे तलाठी घोसरवाडे यांचेकडे आवश्यक ती कागदपत्रासह दिलेली होती.माझे कामाबाबत मी मागील आठवडयात तलाठी घोसरवाडे यांची भेट घेतली असता त्यांनी माझे दोन्ही दस्त फेरफार नोंद करणेकामी माझेकडे 20,000/- रूपये दयावे लागतील असे म्हणुन पैशाची मागणी केली. तरी त्यांचेवर योग्य ती कारवाई व्हावी म्हणुन तक्रार सांगुन मी दिनांक 12/07/2023 रोजी तलाठी घोसरवाडे यांना भेटण्यास जाणार असलेचे सांगीतले. त्यावेळी नाळे साहेबांनी ते स्वतःत्यांचे स्टाफ व पंचासह दिनांक 12/07/2023 रोजी साजणी गावचे जवळ येत असल्याचे सांगीतले त्यावेळी मी त्यांना माणगाववाडी गावचे जवळ रस्त्याकडेला असले तिरूपती राईस मिल जवळ येण्यास सांगुन मी तेथे असल्याचे सांगीतले.

दिनांक 12/07/2023 रोजी मी व नाळे साहेब एकमेकांचे संपर्कात होतो. मी माणगाववाडी जवळ जावुन थांबलो होतो. काहीवेळाने नाळे साहेब व त्यांचा स्टाफ, पंच असे माणगाववाडी जवळ आले. त्यावेळी मी त्यांना भेटुन माझा वरीलप्रमाणे असलेला लेखी तक्रारी अर्ज त्यांचेकडे दिला. त्यावेळी नाळे साहेबांनी माझी शासकीय दोन्ही पंच, त्यांचा स्टाफ सोबत ओळख करून देवुन त्यांचे सुचनेवरून दोन्ही पंचानी मला माझी तक्रार विचारली त्यावर मी त्यांना वरील प्रमाणे माझी तक्रार सांगीतली.

त्यानंतर नाळे साहेबांनी पुढील कारवाई येथुनच करण्याचे आहे असे सांगीतले. साहेबांनी त्यांच्याकडील व्हाईस रेकॉर्डर दाखवुन त्याची संपुर्ण माहिती मला तसेच पंचाना देवुन साजणी- तिळवणी सजाचे तलाठी घोसरवाडे यांचे लाच मागणीचे अनुषंगाने पडताळणी करण्याचे असलेने आवश्यक सुचना देवुन साहेबांनी त्यांचेकडील व्हाईस रेकॉर्डर चालु करून तो माझ्या गळयात अडकवुन मला व पंच नं.1 यांना दुपारी 12.04 वाजता माझेकडील माझेकडील मोटर सायकल एम.एच.09.ईडी.7244 वरून तलाठी कार्यालय साजजणी-तिळवणी, ता.हातकणंगले पाठवुन दिले. मी व पंच नं. 1 साळोखे असे साजणी येथे तलाठी कार्यालयात गेलो. तेथे मी तलाठी घोसरवाडे यांना भेटलो त्यांनी मला माझा खरेदी दस्त चुकला असे सांगुन तो दुरूस्त करून आणणेस सांगीतला त्यावेळी मी त्यांना काय चुकलेले नाही असे म्हणालो त्यावेळी त्यांनी मला खरेदी दस्त चुकलेलाच आहे असे सांगीतले. त्यावेळी मी त्यांना बँकेचे आहे ते काम तर करा असे म्हणालो त्यावेळी ते करणार की रे बाबा असे म्हणाले. त्यावेळी मी दस्त करणा-याला याला फोन करून खरेदी दस्ताबाबत तलाठी यांचेशी बोलण्यास दिला त्यावेळी मित्रांनी ही त्यांना खरेदी दस्त बरोबर असल्याचे सांगीतले त्यावेळी त्यांनी माझा फोन बंद करून दस्त चुकलाच आहे असे सांगीतले. त्यावेळी मी त्यांना



Scanned with CamScanner

तरीपण बघा की तसेच माझे बँकेचे तेवढ तरी काम करा की असे म्हणलो त्यावेळी तलाठी घोसरवाड यांनी मला खरेदी दस्तामध्ये घेणा-याचे नाव आहे देणा-याचे नाव नाही असे म्हणुन खरेदी दस्त चुकला असल्याचे शिस्तात चार वाजता ये असे सांगितले. त्यानंतर मी व पंच नं.1 साळोखे असे नाळे साहेब थांबलेल्या ठिकाणी परत आलो. मला व पंच 1 साळोखे यांना हकीकत विचारून तसेच व्हाईस रेकॉर्डरमध्ये झालेले रेकॉर्डींग ऐकुन खात्री केली. तलाठी घोसरवाडे यांनी मला चार वाजता बोलविल्याने पुढील कारवाई दुपारी 03.30 वाजता करण्याचे सांगुन मला योग्य त्या सुचना देवुन घरी जाणेस सांगीतले.

त्यानंतर मी ठरलेप्रमाणे दुपारी 03.30 वाजता सकाळी नाळे साहेब थांबलेल्या ठिकाणी आलो त्यावेळी तेथे नाळे साहेब, त्यांचा स्टाफ, दोन्ही पंच असे हजर होते. नाळे साहेबांनी मला पुन्हा योग्य त्या सुचना देवुन तलाठी घोसरवाडे यांचे लाच मागणीचे पडताळणी करीता त्यांचेकडील व्हाईस रेकॉर्डर चालु करून तो माझ्या गळयात अडकवुन मला व पंच नं.1 साळोखे यांना दुपारी 03.56 वाजता माझेकडील माझेकडील मोटर सायकल वरून तलाठी कार्यालय साजजणी-तिळवणी, ता. हातकणंगले पाठवुन दिले. मी तलाठी कार्यालयात गेलो तेथे तलाठी घोसरवाड यांची भेट घेतली त्यावेळी त्यांचेत व माझेत माझे खरेदी केलेल्या दस्ताचे सात बारापत्रकी नोंद करणेचे अनुषंगाने तसेच बँकचे बोजा सात बारा पत्रकी नोंद करणेचे अनुषंगाने बोलणे झाले त्यावेळी तलाठी घोसरवाडे यांनी मला तुझे काम जर फायनल मी माझे हिशोबाने मॅनेजमेंट करून मी सगळे केले तर असे म्हणुन हातावर कायतरी लिहले त्यावेळी मी मला वाचायला येत नाही असे म्हणालो त्यावेळी तलाठी घोसरवाड यांनी मला वीस हजार रूपये फायनल करा असे म्हणुन माझेकडे वीस हजार रूपये मागीतले. त्यावेळी मी त्यांना वीस हजार जास्त होतात असे म्हणालो त्यावेळी त्यांनी मला ऑफीस लेवला करून घेतो तुला करायचे असेल तर कर काही अडचण नाही असे म्हणाले. त्यावेळी मी पुन्हा त्यांना वीस हजार जास्त होतात काहीतरी कमी करा असे म्हणालो. त्यावेळी घोसरवाडे यांनी होत नाही ते असे म्हणाले. त्यावेळी मी केंव्हा करूया असे म्हणाले त्यावेळी घोसरवाडे यांनी जर आज विषय केलास तर अठठावीस तारखेपर्यंत काम संपवणार, तु आता दिलेस तर उदया पासुन काम सुरू असे म्हणाले त्यावेळी मी त्याना जातो घेवुन येतो आणि देतो, तासाभरात येतो असे म्हणालो त्यानंतर मी व पंच साळोखे असे नाळे साहेब थांबलेल्या ठिकाणी परत आलो. मला व पंच 1 साळोखे यांना हकीकत विचारून तसेच व्हाईस रेकॉर्डरमध्ये झालेले रेकॉर्डींग ऐकुन खात्री केली. त्यावेळी तलाठी घोसरवाडे हे माझे दोन्ही दस्तांची सातबारा पत्रकी नोंद करणेकामी माझेकडे 20,000/- रूपये लाच मागणी करीत असल्याचे निषन्न झाले.

त्यानंतर तलाठी घोसरवाडे यांच्यावर सापळा कारवाई अनुषंगाने मी हजर केलेली लाच रक्कम 20,000/- रूपयांच्या नोटांना अँथ्रासिन पावडर लावली तसेच आवश्यक ती सर्व सापळापुर्व कार्यवाही करण्यात आली. त्यानंतर सदरच्या नोटा माझे शर्ट डावे बाजुच्या खिशात ठेवण्यात आल्या. त्यानंतर मला दोन्ही पंचाना व सापळा पथकातील अमलदार यांना त्यांच्या त्यांच्या कामाचे अनुषंगाने नाळे साहेबांनी सुचना दिल्या. त्यानंतर सापळा कारवाई करण्याकरीता व्हाईस रेकॉर्डर चालु करून ते माझ्या गळयात अडकविले त्यानंतर मी व पंच 1 साळोखे असे आम्ही थांबलेल्या ठिकाणाहुन माझेकडील मोटर सायकलवरून दुपारी सांयकाळी 05.11 वाजता तलाठी कार्यालय साजणी- तिळवणी येथील कार्यालयाकडे निघालो. त्यावेळी आमचे पाठोपाठ नाळे साहेब, पंच नं.2 लाड व सापळा पथकातील काही कर्मचारी नाळे साहेबांचे सोबत त्यांचे बोलरो जिप मधुन आणि उर्वरीत स्टाफ त्यांचेकडे उपलब्ध असले मोटर सायकलवरून आले व तेथे परिसरात सापळा लावुन थांबले मी तलाठी कार्यालयात गेलो तेथे तलाठी घोसरवाडे नव्हते.त्यांचे कार्यालयात काम करणारा उमेदवार साहील फरास होता. मी त्याला साहेब गेले असे विचारले त्यावेळी साहील याने या की साहेबांनी मला तुम्हाला भेटुन जावा असे सांगीतले आहे असे म्हणाला त्यावेळी मी त्याला साहेबांना भेटायचे होते असे म्हणालो त्यावेळी साहील काय तुम्हाला सांगीतले आहे केलेसा का असे म्हणाला त्यावेळी मी त्यांना साहेब केंव्हा येणार काय असे विचारले त्यावेळी साहील याने तुम्हाला सांगितले ते केलासा का काय काम ते असे म्हणाले त्यावेळी मी काम सांगितले ते की असे म्हणालो त्यावेळी साहील याने किती विस सांगितले आहेत ना असे म्हणाले त्यावेळी मी होय विस सांगीतले आहेत असे म्हणालो त्यावेळी साहील याने मग आणला आहेसा का असे म्हणाला त्यावेळी मी आणलेत की असे म्हणालो. त्यावेळी मी पाच मिनटे थांबा म्हणालो होतो साहेबांना... मग आता कस करायचे... असे म्हणालो त्यावेळी साहील याने ठेवुन जावा की, उदया सकाळी या लवकर सकाळी तुम्हाला नोटीस देतो सहया तेवढया करून आणुन दया असे म्हणाला त्यावेळी मी साहेबांनी वीस हजार रूपये सांगितले आहे तुमच्याकडे दिले तर चालतेय असे म्हणालो त्यावेळी साहील याने दया की मी काय घेवुन जाणार नाही टेबलमध्येच ठेवणार आहे असे म्हणाला त्यावेळी मी त्यांना साहेबांनी सांगीतले आहे...तुमच्यापाशी ठेवायला... असे विचारले त्यावेळी साहील याने मग आता मगापासुन काय कन्नड सांगु... वेगळे सांगु काय... असे म्हणाला त्यावेळी बर मोजुन घेणारा मग असे विचारले त्यावेळी त्याने दया की असे म्हणाला. त्यावेळी मी साहील यास माझे उजवे हाताने माझे शर्टच्या डाव्या खिशातुन पैसे काढुन त्यास पैसे दिले व पैसे मोजुन घे असे म्हणालो.



Scanned with CamScanner

त्यानंतर त्याने पैसे मोजुन घेतले व तलाठी कार्यालयात असले टेबलचे ड्रावर मध्ये ठेवले. त्यानंतर मी तलाठी कार्यालयातुन बाहेर येवुन मी माझा डावा हात डोक्यावरून फिरवुन पैसे स्विकारले नंतरचा पुर्व नियोजीत इशारा केला. त्यानंतर लागलीच नाळे साहेब तसेच सापळा पथकातील अंमलदार पंच नं.2 लाड असे सदर ठिकाणी येवुन स्विकारलेल्या लाच रक्कमेसह साहील फरास यांना पकडले. त्यावेळी तलाठी घोसरवाडे यांना माझे मोबाईलवरून फोन लावला परंतु त्यांनी एक सेकंद थांबा असे म्हणुन फोन कट केला. त्यानंतर लगेचच तलाठी घोसरवाडे यांचा साहील फरास याचे मोबाईलवर फोन आल्याने साहील याने फोन उचलुन मी आल्याचे सांगीतले त्यावेळी तलाठी घोसरवाडे यांनी त्याला मी मघाशी सांगीतलेप्रमाणे कर असे म्हणाले... त्यावेळी साहीले याने त्यांना घेवुन ठेवु ना... ड्राव्हरला ठेवतो सर... असे सांगितले त्यावेळी तलाठी घोसरवाड हे हां... म्हणाले त्यानंतर त्यांच्यात ते कोठे गेले आहेत याबाबत बोलणे झाले. त्यानंतर मी पुन्हा तलाठी घोसरवाडे यांना फोन केला त्यावेळी तलाठी घोसरवाडे यांनी साहीलला भेटा... असे सांगीतले त्यावेळी मी हां म्हणुन साहीलकडे वीस हजार रूपये दिले आहेत बघा... असे म्हणालो त्यावेळी त्यांनी फोन लगेच कट केला. त्यानंतर सदर ठिकाणी लाचेच्या सापळयातील प्राथमिक तपासण्या करून नाळे साहेब व त्यांचेकडील काही स्टाफ हे तलाठी घोसरवाड यांना कोल्हापूर मध्ये ताब्यात घेणेकरता गेले व काहीवेळाने ते तलाठी घोसरवाड यांना ताब्यात घेवुन परत आले. त्यावेळी माझे समक्ष तलाठी घोसरवाड व साहील यांना त्यांचे पुर्ण नाव पत्ता विचारले असता त्यांनी आपले नाव 1) सर्जेराव शामराव घोसरवाडे , वय - 41 वर्षे, तलाठी, सजा - साजणी - तिळवणी, ता. हातकणंगले, जि.कोल्हापूर, सद्या रा. प्लॅट नं.108, स्वप्नपुर्ती अपार्टमेंन्ट, पुईखडी, नविन वाशीनाका जवळ, कोल्हापूर मुळ रा. कांडगाव, ता. करवीर, जि.कोल्हापूर 2) साहील यासीन फरास, वय - 23 वर्षे, खाजगी उमेदवार, , रा. तिरंगा चौक, साजणी, ता. हातकांगले, जि. कोल्हापूर असे असल्याचे सांगितले. त्यानंतर पुढील सविस्तर पडताळणी, सापळापुर्व व सापळा पंचनामा तसेच इतर कार्यवाही ही शासकीय विश्रामगृह, हातकणंगले येथे पुर्ण करण्यात आली. इथुन पुढील फिर्याद मुळ फिर्यादी प्रमाणे आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

(1) **Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**

MAHADEV ISHWARAPPA TODALE(I (Inspector)) / **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**

**Rank (पद):** **No.(क्र.):**

**to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

(4) **Transferred to P.S.**
**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):**

**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**



Scanned with CamScanner

**14 Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

SSP

**15.Date and time of dispatch to the court**
**(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

**Signature of Officer in charge, Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** MAHADEV ISHWARA
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** पोलीस ठाणे अंम.
हातकणंगले पोलीस स्टेशन



Scanned with CamScanner

**Attachment to Item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र): Physical features, deformities and other details of the ( If known / seen )(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्ट्ये, व्यंग आणि इतर तपशील))**

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें.मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |
| 2 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.** (जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)

**Scanned with CamScanner**